0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक १३/०८/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६०/२०१२/जा.६०४, दिनांक २८/०८/२०१२.

३) मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. यांचे दिनांक ०४/०९/२०१२ रोजीचे लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६०/२०१२/जा.७६५
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ०७ /११/२०१२.

### आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ३०/०७/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंचांसह मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. या कंपनीच्या प्लॉट नं. अे-७०, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरीया, तुर्भे कल्याण रोड, एम.आय.डी.सी., महापे, नवी मुंबई या ठिकाणी असलेल्या गोदामाच्या प्रवेशद्वारावर पोहचले. तेथे उपस्थित असलेल्या सुरक्षा रक्षकास अधिकाऱ्यांनी त्यांची ओळख करुन देऊन पंचांसमक्ष येण्याचे प्रयोजन सांगितले. त्यानुसार सदर सुरक्षा रक्षकानी गोदामातील अधिकाऱ्यांशी गेटवरुन इंटरकॉमने संपर्क साधल्यानंतर गोदामातील सुनिल भंन्साळी गेटवर उपस्थित झाले. अधिकाऱ्यांनी त्यांनाही येण्याचे प्रयोजन सांगून गेटवरील नोंदवहीत नोंद केली व तद्नंतर सर्व पथक चालत दोन मिनीटाच्या अंतरावर असलेल्या गोदामाच्या प्रवेशद्वारावर पोहचले. अधिकारी व पंच यांनी त्यानंतर सुनिल भंन्साळी यांचे समवेत गोदामाच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस असलेल्या कार्यालयात प्रवेश करुन कार्यालयात उपस्थित असलेल्या व्यक्तीस त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव अभिषेककुमार सच्चिदानंद उपाध्याय असे असल्याचे सांगून तो वरील कंपनीत व्यवस्थापक या पदावर गेल्या एक वर्षापासून काम करीत असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी त्यांनाही येण्याचे प्रयोजन सांगून त्यांचेकडे गोदामात असलेल्या जीवनावश्यक वस्तूंच्या साठ्याच्या अनुषंगाने अवश्यक त्या

परवान्यांची व कागदपत्रांची विचारणा केली असता, व्यवस्थापकानी सदर गोदाम मे. फ्युचर ॲग्रोव्हेंट लि. या कंपनीचे असल्याचे सांगून व कंपनीच्या नांवे असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ४१/फ/वाशी/संयुक्त परवाना/९७(घा) आणि साखरेचा घाऊक परवाना क्रमांक ४१/फ/वाशी/सं.प./७४(घा) च्या प्रती सादर केल्या. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदर कागदपत्रांची पडताळणी करुन सदर परवान्याच्या अनुषंगाने साठापुस्तक व दैन्यंदिन साठ्याबाबतची विचारणा केली असता, व्यवस्थापक यांनी साठापुस्तक व इतर नोंदवह्या कंपनीच्या वाशी येथील मुख्य कार्यालयात ठेवलेले असल्याचे सांगितले. तसेच साठ्याबाबतची खात्री पटविण्यासाठी साठापुस्तकाची संगणकावर स्कॅन केलेली जुन २०१२ ची प्रत अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष दाखविली. तद्नंतर अधिकाऱ्यांनी गोदामात असलेल्या अनुसुचित वस्तूंचा साठा विहित मर्यादेच्या आत आहे किंवा कसे ? याबाबत व्यवस्थापकाकडे विचारणा केली असता, साठापुस्तक व्यवसायाच्या जागेवर उपलब्ध नसल्यामुळे व्यवस्थापक अधिकाऱ्यांना खात्रीशिर माहिती देऊ शकले नाहीत. सबब, अधिकाऱ्यांनी पंच व उपस्थित इसम अभिषेककुमार सच्चिदानंद उपाध्याय यांच्या समक्ष गोदामातील अनुसुचित वस्तूंची प्रत्यक्ष साठ्याची मोजदाद केली असता, ती खालीलप्रमाणे आढळून आली.

| अ.क्र. | अनुसुचित वस्तू | प्रत्यक्ष मोजदाद करुन आढळलेला साठा (कि.ग्रॅ.) |
|---|---|---|
| १ | तांदूळ | ३६१५८२.५० |
| २ | कडधान्य | २०८९६९.५० |
| ३ | खाद्यतेल/वनस्पती | १३३२६५.०० |
| ४ | साखर | १८०९७५.०० |
| ५ | तेलबिया | ४०२.५० |

अधिकाऱ्यांनी गोदाम व्यवस्थापकास वरील साठ्याबाबत केलेली मोजदाद योग्य व बरोबर असल्याची पंचांसमक्ष विचारणा केली असता, व्यवस्थापकाने साठा वरील प्रमाणे बरोबर असल्याचे मान्य केले व त्याबाबत त्याचा जबाब नोंदविण्यात आला आहे.

तपासणीमध्ये प्रत्यक्ष साठयाची मोजदाद केली असता, तांदुळ - ३६१५८२.५० कि.ग्रॅ. (३६१५.८२५ क्विंटल), कडधांन्य - २०८९६९.५० कि.ग्रॅ. (२०८९.६९५ क्विंटल), खाद्यतेल/वनस्पती - १३३२६५.०० कि.ग्रॅ. (१३३२.६५ क्विंटल), साखर - १८०९७५.०० कि.ग्रॅ. (१८०९.७५ क्विंटल) तसेच खादयतेलबिया - ४०२.५० कि.ग्रॅ. (४.०२५ क्विंटल) साठा आढळून आला. तथापी, महाराष्ट्र डाळी, खाद्यतेल बिया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध), आदेश, (सुधारणा) आदेश, २०१०, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१० अन्वये घाऊक परवानाधारकास महानगरपालिका क्षेत्रात अन्नधान्याच्या साठवणूकीकरिता विहित कमाल मर्यादा ३५०० क्विंटल असून खाद्यतेलाच्या साठवणूकीकरीता विहीत कमाल मर्यादा १००० क्विंटल आहे. सदर तपासणीमध्ये इतर अनुसुचित वस्तु वगळता तांदळाचा ११५.८२५ क्विंटल व खाद्यतेल/वनस्पतीचा ३३२.६५ क्विंटल साठा हा विहीत कमाल मर्यादेपेक्षा

अतिरीक्त आढळला. तसेच त्यांनी परवानामधील नमुद अटींच्या अनुषंगाने भावफलक/साठाफलक, साठा नोंदवही आणि भेटपुस्तक यांचीही पुर्तता न केल्याचे आढळून आल्याने त्यांनी महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसंन्सिंग ऑर्डर, १९९८ अन्वये देण्यात आलेल्या परवानामधील तरतुदींचा भंग केल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने तपासणीमध्ये अतिरीक्त आढळलेला अन्नधान्य व खाद्यतेल/वनस्पतीचा साठा जप्त करण्यात येऊन तो पुढील आदेशापर्यंत जैसेथे स्थितीत ठेवण्याचे व जतन करण्याचे आदेश देवून सदरचा अतिरीक्त आढळलेला साठा कंपनीचे व्यवस्थापक अभिषेककुमार उपाध्यय यांच्या सुपूर्द करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र. १ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०४/०९/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. चे व्यवस्थापक श्री. अभिषेककुमार सच्चिदानंद उपाध्याय व मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. चे लिगल हेड श्री. दया. एम. सोनी यांनी उपस्थित राहून कंपनीच्या वतीने वाचावे क्र. ३ अन्वये लेखी निवेदन सादर करुन सदरच्या तपासणीमध्ये ३३२.६५ क्विंटल खाद्यतेल व ११५.८२ क्विंटल तांदळाचा साठा अतिरिक्त आढळून आल्याचे मान्य केले आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. चे व्यवस्थापक श्री. अभिषेककुमार सच्चिदानंद उपाध्याय व मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. चे लिगल हेड श्री. दया एम. सोनी यांनी कंपनीच्या वतीने सादर केलेल्या निवेदनात, दिनांक ३०/०७/२०१२ रोजी त्यांच्या कंपनीच्या महापे, नवी मुंबई येथील वेअरहाऊसमध्ये भेट देऊन तपासणी घेण्यात आली असता, ११५.८२ क्विंटल तांदूळ व ३३२.६५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसेन्सिंग ऑर्डर, १९९८ अंतर्गत असलेल्या तरतूदींच्या अनुषंगाने अतिरिक्त आढळून आल्याने सदरचा साठा जप्त करण्यात आला आहे. सदर वेअरहाऊसमध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या साठ्याचे साठवणूक व वितरणाचे व्यवसाय त्यांची कंपनी करीत असून तद्नंतर साठवणूक

केलेल्या साठ्यापैकी त्यांच्या कंपनीच्या अधिपत्त्याखालील असलेल्या इतर ग्रुप ऑफ कंपन्यांना नियमितरित्या भारतभर वितरण केले जात असून त्यांच्याकडे असलेल्या अनुज्ञप्तीच्या अनुषंगाने विविध अटींचे ते पालन करीत आहेत. कंपनीचे व्यवसाय हे मोठ्या प्रमाणावर असल्याने सदर वेअरहाऊसमध्ये नियमितरित्या साठ्याचे आवक जावक होत असते. त्यामुळे साठवणूक केलेला साठा हा विहित कमाल मर्यादेपेक्षा अतिरिक्त होऊ नये याची खबरदारी घेण्यात येत आहे. तपासणीच्या आदल्या दिवशी शनिवार व रविवार असल्याने मोठ्या प्रमाणावर साठ्याची आवक झाली असून सदरचा साठा हा तात्काळ विविध ठिकाणी वितरीत करावयाचा होता. तथापी, तो वेळेवर वितरीत न झाल्याने साठा अतिरिक्त आढळून आल्याचे नमूद करुन सदर प्रकरणी त्यांचा जप्त करण्यात आलेला ११५.८२ क्विंटल तांदूळ व ३३२.६५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा न्यायिक दृष्टीने त्यांची विनंती मान्य केल्यास ते अत्यंत उपकृत होतील, असे नमूद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ३०/०७/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंचांसह मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. या कंपनीच्या प्लॉट नं. अे-७०, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरीया, तुर्भे कल्याण रोड, एम.आय.डी.सी., महापे, नवी मुंबई या ठिकाणी असलेल्या गोदामाच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस असलेल्या कार्यालयात प्रवेश करुन कार्यालयात उपस्थित अभिषेककुमार सच्चिदानंद उपाध्याय, व्यवस्थापक यांचेकडे गोदामात असलेल्या जीवनावश्यक वस्तूंच्या साठ्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या परवान्यांची व कागदपत्रांची विचारणा केली असता, व्यवस्थापकानी सदर गोदाम मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. या कंपनीचे असल्याचे सांगून व कंपनीच्या नांवे असलेला संयुक्त घाऊक परवाना क्रमांक ४१/फ/वाशी/संयुक्त परवाना/९७(घा) आणि साखरेचा घाऊक परवाना क्रमांक ४१/फ/वाशी/सं.प./७४(घा) च्या प्रती सादर केल्या. तपासणीमध्ये प्रत्यक्ष साठयाची मोजदाद केली असता, तांदुळ - ३६१५.८२५ क्विंटल, कडधान्य - २०८९.६९५ क्विंटल, खाद्यतेल/वनस्पती - १३३२.६५ क्विंटल, खादयतेलबिया - ४.०२५ क्विंटल साठा तसेच साखर - १८०९.७५ क्विंटल आढळून आला. तथापी, महाराष्ट्र डाळी, खाद्यतेल बिया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध), आदेश, (सुधारणा) आदेश, २०१०, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१० अन्वये घाऊक परवानाधारकास महानगरपालिका क्षेत्रात अन्नधान्याच्या साठवणूकीकरिता विहित कमाल मर्यादा ३५०० क्विंटल असून खाद्यतेलाच्या

HEAD OF ... MUMB

साठवणूकीकरीता विहीत कमाल मर्यादा १००० क्विंटल आहे. सदर तपासणीमध्ये इतर अनुसुचित वस्तु वगळता तांदळाचा ११५.८२५ क्विंटल व खाद्यतेल/वनस्पतीचा ३३२.६५ क्विंटल साठा हा विहीत कमाल मर्यादेपेक्षा अतिरीक्त आढळला. तसेच त्यांनी परवानामधील नमुद अटींच्या अनुषंगाने भावफलक/साठाफलक, साठा नोंदवही आणि भेटपुस्तक यांचीही पुर्तता न केल्याचे आढळून आले आहे. सबब, महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसन्सिंग ऑर्डर १९९८ चे कलम १५ (सी) मधील तरतुदीनुसार सदरचा अतिरिक्त आढळून आलेला तांदूळ व खाद्यतेल/वनस्पतीचा साठा हा जागीच जप्त करुन पंचांसमक्ष उपस्थित इसमाचा लेखी जबाब नोंदविण्यात आला आहे. अशाप्रकारे नमूद आस्थापनाने महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसन्सिंग ऑर्डर १९९८ आणि त्याअंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या परवान्यामधील अटी/शर्तीचा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ मधील तरतूदींचा भंग केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने अतिरिक्त आढळून आलेला साठा जप्त करुन पुढील आदेशापर्यंत कंपनीचे व्यवस्थापक अभिषेककुमार उपाध्याय यांना सुपूर्दनाम्याद्वारे ताब्यात देऊन जतन करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

केंद्रशासनाचे, ग्राहक बाबी, अन्न व सार्वजनीक वितरण मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्र. एस.ओ.[illegible] (अ), दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ अन्वये तांदुळ या अनुसुचित वस्तूवर दिनांक ३०/११/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध होते व तद्नंतर अधिसुचना क्र एस.ओ.२३[illegible] (ई), दिनांक २७ सप्टेंबर, २०१२ अन्वये दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत.

"महाराष्ट्र डाळी, खाद्यतेल बिया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध), आदेश, (सुधारणा) आदेश, २०१०" अन्वये महानगरपालिका क्षेत्रामध्ये घाऊक परवानाधारकास साठवणूकीकरीता तांदळासाठी ३५०० क्विंटल व खाद्यतेल (वनस्पती तेलासह) १००० क्विंटल विहित कमाल मर्यादा नमूद आहे.

मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. चे व्यवस्थापक श्री. अभिषेककुमार सच्चिदानंद उपाध्याय व लिगल हेड श्री. दया एम. सोनी यांनी कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, दिनांक ३०/०७/२०१२ रोजी त्यांच्या कंपनीच्या महापे, नवी मुंबई येथील वेअरहाऊसमध्ये भेट देऊन तपासणी घेण्यात आली असता, ११५.८२ क्विंटल तांदूळ व ३३२.६५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसेन्सिंग ऑर्डर, १९९८ अंतर्गत असलेल्या तरतूदींच्या अनुषंगाने अतिरिक्त आढळून आल्याचे मान्य केले आहे. सदर वेअरहाऊसमध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या साठ्याचे साठवणूक व वितरणाचे व्यवसाय त्यांची कंपनी करीत असून तद्नंतर साठवणूक केलेल्या साठ्यापैकी त्यांच्या कंपनीच्या अधिपत्याखालील असलेल्या इतर ग्रुप ऑफ कंपन्यांना नियमितरित्या भारतभर

वितरण केले जात असून त्यांच्याकडे असलेल्या अनुज्ञप्तीच्या अनुषंगाने विविध अटींचे ते पालन करीत आहेत. तपासणीच्या आदल्या दिवशी शनिवार व रविवार असल्याने मोठ्या प्रमाणावर साठ्याची आवक झाली असून सदरचा साठा हा तात्काळ विविध ठिकाणी वितरीत करावयाचा होता. तथापी, तो वेळेवर वितरीत न झाल्याने साठा अतिरिक्त आढळून आल्याचे नमूद करुन सदर प्रकरणी त्यांचा जप्त करण्यात आलेला ११५.८२ क्विंटल तांदूळ व ३३२.६५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा न्यायिक दृष्टीने त्यांची विनंती मान्य केल्यास ते अत्यंत उपकृत होतील, असे सांगितले आहे.

प्रस्तूत प्रकरणी, मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. या कंपनीच्या नावे महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसेन्सिग ऑर्डर, १९९८ अंतर्गत अन्नधान्य (तांदूळ), डाळी/कडधान्य व खाद्यतेल या अनुसुचित वस्तूंच्या घाऊक व्यवसायासाठी क्रमांक ४१ फ वाशी/संयुक्त परवाना/९७ (घा) अन्वये घाऊक परवाना असल्याचे दिसून येते. उपरोक्त तपासणीमध्ये नमूद वेअरहाऊसमधील साठवणूक केलेल्या विविध अनुसुचित वस्तूंची पंचांसमक्ष मोजदाद करण्यात आली. तद्नंतर मोजदाद केलेल्या साठ्यापैकी कमाल विहित मर्यादेच्या आत असलेला अनुसुचित वस्तूंचा साठा जागीच मुक्त करुन उर्वरीत साठ्यापैकी विहित कमाल मर्यादेपेक्षा अतिरिक्त आढळून आलेला तांदूळ व खाद्यतेल/वनस्पतीचा साठा हा जागीच सिल करण्यात आला. तसेच सदर तपासणीच्या वेळेस पथकास जीवनावश्यक वस्तुंच्या खरेदी, विक्री व साठवणूक संबंधिचे सर्व दस्तऐवज व अभिलेख सादर करणे आवश्यक असतांना नमूद कंपनीने तपासणीच्यावेळी तसेच सुनावणीच्या वेळेसही परवान्यामधील अटींच्या अनुषंगाने साठा नोंदवही, भेटवही इत्यादींची पूर्तता न केल्याचे आढळून आले. ही बाब गंभीर आहे.

दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायन्सींग ऑर्डर, १९९८ अन्वये देण्यात आलेल्या घाऊक अनुज्ञप्तीमध्ये अट क्र. ३ नुसार परवानाधारकास साठा पुस्तक अद्यावत ठेवणे आवश्यक असून त्यामध्ये त्या दिवसाचे प्रारंभिक शिल्लक, दिवस भरातील आवक, विक्री व दिवस अखेर प्रत्यक्ष शिल्लक त्याच दिवशी दर्शविणे आवश्यक असून साठा पुस्तकात प्रत्येक अनुसुचित वस्तूचे स्वतंत्र तपशिल दर्शविणे आवश्यक आहे. तसेच परवानाधारकाने मासिक विवरण पत्र प्रत्येक पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक आहे. अनुज्ञप्तीमधील अट क्र. ४ नुसार परवानाधारकाने शासनाकडून विशेष सुट मिळाल्याखेरीज त्यांनी अनुज्ञप्तीप्राधीकाऱ्यास प्रपत्र ड मध्ये अनुसुचित वस्तू निहाय आवक, वितरण इत्यादी बाबतचे मासिक विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अनुज्ञप्तीमधील अट क्र. ५ नुसार परवानाधारकाने त्यांना प्राधिकृत करण्यात आलेल्या परवानामधील नमूद जीवनावश्यक वस्तूंचे विक्री व साठवणूकीबाबत त्यांना देण्यात आलेला परवान्यामधील अटींचे व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे तसेच पर्यायाने त्यांनी जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चा भंग करु नये. अनुज्ञप्तीमधील अट

क्र.६ नुसार परवानाधारकाने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा स्थानिक बाजारपेठेत सुरळित न राहण्याच्या दृष्टीने अनुसुचित वस्तूंचे खरेदी, विक्री व साठवणूकीच्या व्यवहारामध्ये सहभागी होऊ नये. अनुज्ञप्तीमधील अट क्र. ७ नुसार परवानाधारकाने नमूद व्यवसायाच्या पत्त्यावर दर्शनी भागात साठा फलक व भाव फलक लावणे आवश्यक आहे. अनुज्ञप्तीमधील अट क्र. ८ नुसार परवानाधारकास त्यांनी विक्री केलेल्या अनुसुचित वस्तुंच्या विक्री पावत्यांसह संपूर्ण तपशिल संबंधितांस देणे आवश्यक असून सदर पावत्यांच्या स्थळप्रती तपासणीच्या वेळेस तपासणी अधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक आहे. अनुज्ञप्तीमधील अट क्र. ९ नुसार परवानाधारकाने तपासणी करण्याकरिता आलेल्या पथकास साठा पुस्तक व त्या नुसार असलेला प्रत्यक्ष साठा याबाबतच्या परिक्षणास योग्य ते सहकार्य करणे आवश्यक आहे. अनुज्ञप्तीमधील अट क्र. १० नुसार परवानाधारकाने तपासणी पथकास साठा पुस्तक, मासिक विवरणपत्र, खरेदी बिले व विक्री केलेल्या मालाचे पावती पुस्तकाच्या स्थळप्रती सादर करणे आवश्यक आहे. तसेच अनुज्ञप्तीमधील अट क्र. १३ नुसार परवानाधारकाने उपरोक्त नमुद अटी/शर्तीचे उल्लंघन केल्यास तो कायदेशिर कारवाईस पात्र ठरतो.

मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. यांच्या तपासणीमध्ये इतर अनुसुचित वस्तु वगळता ११५.८२ क्विंटल तांदूळ व ३३२.६५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा विहीत कमाल मर्यादेपेक्षा अतिरीक्त आढळला. तसेच त्यांनी परवानामधील नमुद अटींच्या अनुषंगाने भावफलक/साठाफलक, साठा नोंदवही आणि भेटपुस्तक यांचीही पुर्तता न केल्याचे आढळून आल्याने तसेच अनुज्ञप्ती प्राधिकारी यांना मासिक विवरणपत्रही सादर न केल्याचे दिसून आल्याने त्यांनी दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंन्सिंग ऑर्डर १९९८ च्या खंड ४ (२) अन्वये देण्यात आलेल्या परवानामधील अट क्र. ३, ४, ५, ६, ७, ८, व ९ तसेच जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३, ७, ८, व १० चा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. यांनी त्यांचे वेअरहाऊसमध्ये साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंच्या साठयापैकी तांदूळ व खाद्यतेलाचा साठा हा त्यांना दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायन्ससींग ऑर्डर, १९९८ अन्वये देण्यात आलेल्या संयुक्त घाऊक परवाना मधील विहीत कमाल मर्यादेपेक्षा अतिरीक्त आढळलेला ११५.८२ क्विंटल तांदूळ व ३३२.६५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा नफेखोरीच्या तसेच साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केल्याचे निष्पन्न झाल्याने, सदर अतिरिक्त आढळलेला संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात पुढील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) प्रस्तूत प्रकरणी मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. यांचा जप्त करण्यात आलेला ११५.८२ क्विंटल तांदूळ व ३३२.६५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण तांदूळ व खाद्यतेलाचा साठा उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावून येणारी रक्कम, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. चे मालक
२) मे. फ्युचर ॲग्रोव्हेट लि. चे व्यवस्थापक अभिषेककुमार सच्चिदानंद उपाध्याय
(उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे मार्फत)

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, का.क्र. ५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user F\Amaldata-2012\Ammal Aadesh\Aadesh.doc